आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

School Leadership Academy

Maharashtra

मोड्यूल क्र.१२

# "कोकण विभागातील रत्नागिरी जिल्हयातील समावेशित शिक्षण क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका"

# "The Role Of School Leadership in the Field of Inclusive Education in Ratnagiri District of Konkan Division"



## प्रस्तावना -

शिक्षण हक्क कायदा RTE 2009 असे सांगतो की, प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे. आपल्या शाळेतून, वर्गातून प्रत्येक बालकाच्या सामाजिक, संविधानिक व कायदेशीर हक्कांबद्दलचा समावेश शैक्षणिक क्रियेतून, कृतीतून दिसून आला पाहिजे, विविध पार्श्वभूमीच्या विविध गरजा व क्षमता असणाऱ्या बालकांचा समावेश करण्यासाठी विशेष तयारी दाखविली पाहिजे. शाळेने परिवर्तनशील व फलदायी अशी पार्श्वभूमी पुरविल्याने कल्पना, ज्ञान, मूल्य व माहिती यांचे वहन व संक्रमण होते.

**'समावेशक शिक्षण म्हणजे सर्वांसाठीचे असे शिक्षण यामध्ये सर्व विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत समान सहभागी असतील.'**

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना समावेशक शिक्षणाची सुविधा पुरविणे हे या विश्वासावर आधारित आहे की, सर्वांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक संसाधनांचा, उपक्रमांचा व कृतींचा लाभ त्यांना मिळावा व या विशेष मुलांना केवळ विशेष सेवांवर अवलंबून राहावे लागू नये.

कोकण विभागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम अनेक अडचणींना, आव्हानांना तोंड देत मुख्याध्यापक व शिक्षक करीत असतात. अनेकविध समस्यांमुळे शाळेमध्ये दिव्यांग मुलांच्या

प्रगतीसाठी काम करताना येणाऱ्या समस्यांवर,अडचणींवर समर्थपणे मात करता यावी , अनेक शाळांना अशा परिस्थितीतही नेत्रदीपक यश प्राप्त करता यावे या हेतूने प्रस्तुत मोड्यूल विकसित करण्यात आले आहे.

## ➢ मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -

१. समावेशित शिक्षण विषयक संकल्पना समजून घेणे.

२. समावेशित शिक्षण क्षेत्रामध्ये यशस्वीपणे काम करणाऱ्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

३. समावेशित शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी शालेय नेतृत्व आणि शिक्षक यांचा दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

➢ **वर्ष 2018/19 च्या सर्वेक्षणानुसार सरल प्रणालीच्या संकलित माहितीच्या आधारे महाराष्ट्रातील जिल्हा निहाय (विशेष)CWSN विद्यार्थ्यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारा तक्ता**

| **Std - Pre Primary to Std 12 th** | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **District Name** | **Boys** | **Girls** | **Total** |
| 1 | AHMADNAGAR | 7218 | 4938 | 12156 |
| 2 | AKOLA | 3347 | 2354 | 5701 |
| 3 | AMRAVATI | 4835 | 3530 | 8365 |
| 4 | AURANGABAD (MAHARASHTRA) | 6676 | 4155 | 10831 |
| 5 | BHANDARA | 3088 | 2652 | 5740 |
| 6 | BID | 7330 | 4315 | 11645 |
| 7 | BULDANA | 5878 | 4240 | 10118 |
| 8 | CHANDRAPUR | 4306 | 3486 | 7792 |
| 9 | DHULE | 3587 | 2574 | 6161 |
| 10 | GADCHIROLI | 3460 | 3016 | 6476 |
| 11 | GONDIYA | 2689 | 2098 | 4787 |
| 12 | HINGOLI | 2554 | 1832 | 4386 |
| 13 | JALGAON | 5581 | 3146 | 8727 |
| 14 | JALNA | 2343 | 1886 | 4229 |
| 15 | KOLHAPUR | 5219 | 3278 | 8497 |
| 16 | LATUR | 4516 | 3041 | 7557 |
| 17 | MUMBAI (SUBURBAN) | 7478 | 5196 | 12674 |
| 18 | MUMBAI II | 8922 | 6161 | 15083 |
| 19 | NAGPUR | 8055 | 6329 | 14384 |
| 20 | NANDED | 5679 | 3980 | 9659 |
| 21 | NANDURBAR | 1102 | 857 | 1959 |
| 22 | NASHIK | 8229 | 5816 | 14045 |
| 23 | OSMANABAD | 3695 | 2979 | 6674 |
| 24 | PALGHAR | 3873 | 2885 | 6758 |
| 25 | PARBHANI | 5838 | 4317 | 10155 |
| 26 | PUNE | 16947 | 13220 | 30167 |
| 27 | RAIGARH (MAHARASHTRA) | 3812 | 2873 | 6685 |
| 28 | RATNAGIRI | 3505 | 2516 | 6021 |
| 29 | SANGLI | 8412 | 6329 | 14741 |
| 30 | SATARA | 6436 | 4884 | 11320 |
| 31 | SINDHUDURG | 2351 | 1685 | 4036 |
| 32 | SOLAPUR | 6095 | 4084 | 10179 |
| 33 | THANE | 10309 | 7444 | 17753 |
| 34 | WARDHA | 2895 | 2048 | 4943 |
| 35 | WASHIM | 2673 | 1895 | 4568 |
| 36 | YAVATMAL | 4419 | 3418 | 7837 |
| | **Grand Total** | 193352 | 139457 | 332809 |

**वर्ष 2018-19 च्या सर्वेक्षणानुसार सरल प्रणालीच्या संकलित माहितीच्या आधारे रत्नागिरी जिल्हयातील तालुकानिहाय( विशेष ) CWSN विद्यार्थ्यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारा तक्ता**

| Std - Pre Primary to Std 12 th | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **District Name** | **Boys** | **Girls** | **Total** |
| 1 | CHIPLUN | 318 | 256 | 574 |
| 2 | DAPOLI | 404 | 274 | 678 |
| 3 | GUHAGAR | 164 | 125 | 289 |
| 4 | KHED | 467 | 409 | 876 |
| 5 | LANJA | 258 | 180 | 438 |
| 6 | MANDANGAD | 265 | 195 | 460 |
| 7 | RAJAPUR | 304 | 222 | 526 |
| 8 | RATNAGIRI | 952 | 588 | 1540 |
| 9 | SANGMESHWAR | 373 | 267 | 640 |
| **Grand Total** | | 3505 | 2516 | 6021 |

## समावेशित शिक्षणक्षेत्र-संकल्पना

विशेष गरजा असलेली मुले बऱ्याचदा शिक्षण प्रवाहातून दूर गेलेली पाहायला मिळतात. अशा दिव्यांग मुलांना शाळेत आणणे ,त्यांना शाळेत टिकविणे व त्यांच्या शैलीनुसार शिकण्याची संधी उपलब्ध करून देऊन त्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे हे शाळांसाठी आव्हान आहे. समावेशित शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना मूलभूत शिक्षण हक्क प्राप्त करून देण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. दिव्यांग मुलांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन शाळा नेतृत्वाकडील सर्वात मोठा गुण असतो. दिव्यांग मुलांना मनापासून स्वीकारून, त्यांना आवश्यक असणाऱ्या शैलीनुसार अध्ययन-अध्यापन करणे यासाठी शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या कौशल्यांचा कस लागतो.

18 डिसेंबर 2016 रोजी केंद्र शासनाद्वारे Right of person with Disability (RPWP)2016 अमलात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण 2,कलम 3 पक्षपात व भेदभाव न करणे. प्रकरण 3- शिक्षण कलम-16, 17 व प्रकरण 6 कलम 21 अन्वये आरटीआय 2006 चा संदर्भ नमूद करून विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता **खालील 21 प्रकारातील विशेष गरजा असणाऱ्या** सर्व विद्यार्थ्यांना दिव्यांग समावेशित शिक्षणाद्वारे मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. पूर्णतः अंध | २. मानसिक आजार | ३.भाषण(वाचा)व भाषा अक्षमत्व |
| ४. अंशतः अंध | ५. स्वमग्न | ६.थॅलसेमिया |
| ७. कुष्ठरोग निवारित | ८. सेरेब्रल पाल्सी | ९.हिमोफिलिया |
| १०. कर्णबधिर | ११. स्नायूंची विकृती | १२.सिकल सेल आजार |
| १३.लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह | १४. मज्जासंस्थेचे तीव्र आजार | १५.बहुविकलांग |
| १६. शारीरिक वाढ खुंटणे | १७. अध्ययन अक्षम | १८. ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम |
| १९. बौद्धिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) | २०.बहुविध दृधन अपदयरर (Multiple Sclerosis) | २१.पार्किसन्स आजार |

## समावेशित शिक्षणाची पुढील वैशिष्ट्ये ही शिक्षकास आपली अध्यापननिती ठरविण्यास मदत करतात

- सामूहिक कृतींमुळे विद्यार्थ्यास सहकार्यात्मक अध्ययन प्रभावी वाटते. गटबांधणी, नेतृत्व विकास,सहभाग, आंतरक्रिया इत्यादी सामाजिक कौशल्ये सहकार्यात्मक अध्ययनामुळे विकसित होऊन समावेशक शिक्षणाचे बलस्थान ठरते. परस्पर सहकार्याने शैक्षणिक विकासात मदत करणे, सर्वांची प्रगती होणे हेच गटाचे यश. या कार्यनीतीच्या वैशिष्ट्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून त्यांच्या अंगवळणी ती कशी पडतील, हे शिक्षकाने पाहावे.

- वर्गशिक्षकाने सर्वप्रकारच्या मुलांना विषय ज्ञान देताना, त्यांच्यामध्ये अध्यापन कुशलतेची आवश्यकता असते. ते अध्यापन करीत असताना दुसऱ्या शिक्षकांकडून जरूर तेव्हा त्यांस आधार देऊन अध्यापनातील उणीव भरून काढली जाते. अशा वेळी उभय शिक्षकांमधील संबंध लवचिक आणि संपर्क प्रभावी असणे आवश्यक आहे.
- आपल्या वर्गातील वा खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना एखाद्या विद्यार्थ्याने शिकविल्यास त्या विद्यार्थ्यांमध्ये स्वप्रतिष्ठा, आत्मविश्वास बळावेलआणि त्या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये विषय समज वाढेल.
- उच्चार, भाषा, शरीर, व्यवसाय यांसंबंधित त्रुटी विशेष मुले व सामान्य मुले यांच्यातून दूर होण्यासाठी संबंधित उपचारतज्ज्ञ गरजनिहाय उपचार करतात.
- दोन्ही तऱ्हेच्या मुलांच्या शैक्षणिक, भावनिक, सामाजिक इत्यादी गरजा लक्षात घेऊन अभ्याक्रमात वेळोवेळी सुधारणा केल्या जातात.
- ज्या शाळांकडे सर्व प्रकारच्या अध्ययनाच्या सुविधा असतात, त्या शाळांमध्ये सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश देऊन शिक्षक व शिक्षणसंस्था त्यांचे स्वागत करतात.
- वर्गामध्ये जास्त विद्यार्थी असले, तरी शिक्षक मुलांकडे वैयक्तिक लक्ष देऊन सर्व उपक्रमांमध्ये त्यांना सहभागी करतात व त्यांची प्रगती करतात.गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहात नाहीत.
- सर्व मुलांना सामाजिक कार्याची माहिती दिली जाते.
- मुलांच्या शैक्षणिक व इतर समस्या सोडविण्याकरिता सर्व शिक्षक विचारविनिमय करतात.

## समावेशित शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजना :

- **उपक्रम**

1. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी क्षेत्रीय भेटी
2. संदर्भीय प्रशिक्षण हस्तपुस्तिका, कार्यपुस्तिका, शोधपत्रिका व वैयक्तिक शैक्षणिक आराखडे इत्यादी साहित्याचे वितरण.
3. विद्यार्थ्यांना 10 महिन्यांकरिता वसतिगृह भत्ता ,परिवहन भत्ता.
4. बाह्य थेरेपी सेवा उपलब्ध करून देणे.
5.ब्रेल बुक लार्ज प्रिंट करिता तरतूद .
6.साहित्य साधने व उपकरणे वितरण, देखभाल व दुरूस्ती.
7. औपचारिक कार्यात्मक वैद्यकीय निदान व उपचार शिबिरे ,अनुकूलित साहित्य साधने व उपकरणे वितरण, देखभाल व दुरुस्ती.
9. मुलींसाठी प्रोत्साहन भत्ता.
10. समावेशित समन्वयक, विशेष तज्ज्ञ, विशेष शिक्षक यांच्यासाठी बहुदिव्यांग प्रवर्गनिहाय प्रशिक्षण.
11.जाणीव जागृती साहित्यनिर्मिती.
12. विशेष शिक्षक नियुक्ती.
13. मदतनीस भत्ता.
14. डे केअर सेंटर (गृह मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी )
15.दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लेखनिक व वाचक भत्ता.
16.जिल्हा सक्षमीकरण समन्वयक, जिल्हा समन्वयक ,विशेष तज्ज्ञ,फिजिओथेरपिस्ट, मानसशास्त्रतज्ज्ञ यांची नियुक्ती.
१७. उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेत सोयी - सवलती.

- **प्रशिक्षण**

1.शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख ,विशेष शिक्षक, विशेष तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ,अधिव्याख्याता, प्रवर्तक, समन्वयक यांच्यासाठी पाच दिवसीय अध्यापन तंत्र पद्धतीवर आधारित प्रशिक्षण.
2. शिक्षणाधिकारी / प्राचार्य डायट यांचे समावेशित शिक्षणावर आधारित व्यवस्थापनाबाबत सक्षमीकरण करण्यासाठी प्रशिक्षण. गटशिक्षणाधिकारी ,विस्ताराधिकारी ,संपर्कप्रमुख यांचेही वरील विषयांचे प्रशिक्षण.

3. विकासात्मक विलंबता असणाऱ्या बालकांसाठी अंगणवाडीताईंना तीन दिवसीय प्रशिक्षण.
4. पालक प्रशिक्षण एक दिवसीय.
5. वैद्यकीय व शैक्षणिक शिफारसीसाठी वैद्यकीय तज्ज्ञ व शैक्षणिक तज्ज्ञ यांच्यासाठी प्रशिक्षण.
6. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्याबाबत केंद्र स्तरावर कार्यशाळेचे आयोजन.

## समावेशित शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वासमोरील आव्हाने

शालेय नेतृत्व विद्यार्थी ,पालक आणि समाज यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रिया बऱ्याचदा यशस्वी होत नाहीत. समावेशित शिक्षण क्षेत्रात शालेय नेतृत्व आणि शिक्षक यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत. ती पुढील प्रमाणे -

❖ **विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने**

1. बहुअध्ययन शैली असणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थितीबाबत अनियमितता.
2. शिक्षक व सहअध्यायींसोबत संवाद साधण्यात अडचण.
3. प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव.
4. शाळेत अध्ययनशैलीनुसार शैक्षणिक व भौतिक सुविधांचा अभाव.
5. शासनाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या सेवा-सुविधा.
6. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणारा न्यूनगंड व अपराधीपणाची भावना.
7. विविध सहशालेय उपक्रमात सहभागी होण्यात येणाऱ्या अडचणी.
8. डोंगराळ भाग, शाळा ते घर अंतर जास्त असल्याने शाळेत येण्यात अडचण .
9. सर्वसमावेशक शालेय वातावरणाचा अभाव .
10. आपल्या भावना, अडचणी व्यक्त करण्यात संकोच .
11. दिव्यांग पाल्याबाबत पालकांची असलेली उदासीनता .
12. मासिक पाळीच्या वेळी विद्यार्थिनींना येणाऱ्या समस्या.

❖ **पालकांशी संबंधित आव्हाने**

1. बेरोजगारी व आर्थिक परिस्थिती, व्यसनाधीनता.
2. पालकांमधील अशिक्षितपणा, अज्ञान व अंधश्रद्धेचा पगडा.
3. योग्य प्रशिक्षण व समुपदेशनाचा अभाव .
4. पाल्यासाठी पालक पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत.
5. दिव्यांग मूल स्वीकारण्याबाबत उदासीनता .
6. पालक स्वतः दिव्यांग असणे.
7. दिव्यंगत्वाबाबत पालकांचे अज्ञान
8. वयात आलेल्या दिव्यांग मुला-मुलींच्या भवितव्याची चिंता.
9. दिव्यांग मुलासोबत समाजात वावरताना येणारा न्यूनगंड.
10. दिव्यांग मूल व सामान्य मूल यांच्यात समतोल साधण्यात येणारी अडचण .

❖ **शिक्षकांशी संबंधित आव्हाने**

1. दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यातील उदासीनता.
2. सहकारी शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे अपुरे सहकार्य.
3. प्रशिक्षणाअभावी अध्यापन करण्यात व योग्य मार्गदर्शन करण्यात समस्या.
4. पालकांचे अपुरे सहकार्य.
5. शिक्षकांचा प्रशासकीय कामात जाणारा वेळ.
6. अतितीव्र चंचलता असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना वर्गात समावेशन करण्यात समस्या.
7. मूल्यमापनाबाबत समस्या.
8. शाळेतील अपुरी शिक्षक संख्या.
9. विद्यार्थी संख्या जास्त असल्याने वैयक्तिक लक्ष देण्यास येणारी समस्या.
10. विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेण्यात व संवाद साधण्यात समस्या.

❖ **समाजाशी संबंधित आव्हाने**

1. दिव्यंगत्वासंबंधी असणारे अज्ञान, अंधश्रद्धा व गैरसमज.
2. दिव्यंगत्वासंबंधी उदासीनता व हेटाळणी.
3. जनजागृतीचा अभाव.
4. सामाजिक कार्यक्रमात दिव्यांग बालकांना संधी देण्यात भीती.
5. दिव्यांगांच्या सबलीकरणाबाबत समाजाची नकारात्मक भूमिका.
6. दिव्यांग पाल्य व त्याचे कुटुंब यांचा समाजाकडून होणारा अस्वीकार.
7. दिव्यांग शाळा प्रवेशाबाबत समाजाकडून होणारा अडसर.

# यशोगाथा

## दिव्यगुणी श्रेयस



सर्वसामान्य मुलांप्रमाणेच दिव्यांग मुलांनाही शिक्षण प्रवाहात आणून, सर्वसामान्य जीवन जगण्यासाठी सक्षम बनविणे हे प्रत्येक आई-वडील, समाज, शिक्षक यांचे आद्य कर्तव्य आहे. हे कर्तव्य बजावत असताना सर्वात महत्त्वाची भूमिका ही शिक्षकाची असते. कारण विद्यार्थी जास्त वेळ शाळेत व्यतीत करत असतो. असाच एक दिव्यांग विद्यार्थी श्रेयस हा जून २०१६ मध्ये आमच्या शाळेत दाखल झाला. शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या कमकुवत असणारा हा विद्यार्थी सतत रडत असायचा. सुरुवातीला त्याची आजी त्याच्यासोबत राहून त्याला शाळेत बसविण्याचा प्रयत्न करायची, मात्र तो शाळेत बसायलाच तयार नव्हता. ही गोष्ट लक्षात आल्यावर आम्ही शिक्षकवृंदानी त्याच्या आईला भेटण्याचे नियोजन केले.

आम्ही शिक्षकवृंद त्याच्या घरी गेलो आणि श्रेयसच्या आईला भेटलो. त्यांच्याकडून माहिती जाणून घेतली, तेव्हा लक्षात आले की, श्रेयसच्या जन्माच्या वेळी तो घुसमटला होता. त्याला श्वास घ्यायला खूपच त्रास झाला होता. त्यानंतर वर्ष-दीड वर्षापर्यंत तो खूपच रडायचा. कालांतराने मात्र त्याचे रडणे कमी झाले. डॉक्टरांना दाखविल्यानंतर त्यांनी सांगितले की, त्याला ज्ञानप्राप्तीसाठी किंवा इतर सर्वसाधारण गोष्टी समजण्यासाठी अन्य मुलांच्या तुलनेत ६ महिने ते १ वर्ष इतका जास्तीचा कालावधी लागेल.

श्रेयस शाळेत दाखल झाला होता; पण आम्हाला त्याचे वागणे काही कळत नव्हते. त्याला कसे समजवावे हा मोठा प्रश्न आमच्यासमोर होता. मात्र आमच्या दृष्टीने तो नियमित शाळेत येणे हे महत्वाचे होते. त्याला शाळेतील मुलांमध्ये सहभागी करून घेणे हे आमच्यासमोरचे आव्हान होते. मात्र त्याची निरीक्षण क्षमता चांगली आहे हे जाणवले. शाळेच्या बाकावर, टेबलावर वाजवत राहणे या कृती दिसून आल्या. त्यानंतर शालेय परिपाठाच्यावेळी त्याच्या हातात डफली, हातेली, झांज दिली. त्यावेळी तो ठेक्यावर वाजवण्याचा प्रयत्न करू लागला.

नंतर त्याला ढोलकी वाजविण्यास दिली, तेव्हा प्रथम तो लाजत होता, जणू काही आपल्याला हे जमणार नाही, बाकीची मुले हसतील असे भाव त्याच्या चेहऱ्यावर जाणवत होते. त्याला जवळ घेऊन थोडा धीर दिला.थोडे प्रोत्साहन दिल्यानंतर तो रोजच स्वतःहून पुढे येऊ लागला. परिपाठात सहभाग घेऊ लागला. त्याच्या स्वभावामध्ये थोडी स्थिरता आली, तसेच चंचलताही कमी झाली.

शरीराचा एखादा अवयव जरी कमकुवत असला, तरी निसर्गाने कोणता ना कोणता विशेष गुण प्रत्येकालाच दिलेला असतो. श्रेयसचेही असेच आहे. त्याला संगीत, वाद्ये यांची खूप आवड आहे. तो उत्कृष्ट पद्धतीने ढोलकी वाजवतो तसेच शाळेत असणारी सगळी वाद्ये त्याला वाजवता येतात. या त्याच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेच्या प्रत्येक सहशालेय व सांस्कृतिक कार्यक्रमात त्याला अग्रक्रमाने संधी देण्याचे काम शिक्षक वर्गाकडून नेहमी केले जाते.

तालुकास्तर समावेशित शिक्षण अंतर्गत श्रीम. भुपाली देसाई व श्रीम. रुबिना नावलेकर यांनी शाळेला भेट देऊन आम्हांला योग्य मार्गदर्शन केले व त्याला कार्यानुभव अंतर्गत हस्तकला, बागकाम, मातकाम, कला विषयांतर्गत चित्र रंगविणे, मातीच्या वस्तू बनविणे व रंगविणे आदी गोष्टी करायला द्या असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही श्रेयसला

वस्तू, रंग उपलब्ध करून दिले आणि काय आश्चर्य! त्याने अतिशय सुंदर अशी चित्रे व वस्तू बनवून रंगविल्या. त्याचा खूप फायदा झाला. तो कलेमध्ये गुंतून राहू लागला आणि त्यात त्याला आवड निर्माण झाली.

समावेशित शिक्षण अंतर्गत तालुकास्तरीय दिव्यांग विद्यार्थी निर्मित प्रदर्शनामध्ये त्याच्या वस्तू मांडण्यात आल्या. प्रदर्शन पाहण्यासाठी मुद्दामहून शाळेतील विद्यार्थी घेऊन आम्ही राजापूरला गेलो. त्या प्रदर्शनामध्ये आपल्या स्वतःच्या वस्तू पाहून त्याच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. तो खूप भारावून गेला.

खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शारीरिक कौशल्ये विकसित होत असतात, हे ओळखून श्रेयसला कोणत्या खेळात आवड आहे हे जाणून घेऊन त्याला त्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. दिव्यांग विद्यार्थी क्रीडास्पर्धेत केंद्रस्तरीय, तालुकास्तरीय क्रीडास्पर्धेत सहभागी करून त्याच्या क्रीडा कौशल्याला चालना देण्यात आली. या प्रयत्नांमुळेच त्याने केंद्रस्तरीय क्रीडास्पर्धेत स्पॉट जम्प, धावणे या क्रीडाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला व बीटस्तरीय क्रीडास्पर्धेतही प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकावून तो तालुकास्तरीय क्रीडास्पर्धेत सहभागी झाला.

आज श्रेयस इतर मुलांप्रमाणे कमी अधिक प्रमाणात सर्व उपक्रमांत सहभागी होत असून जन्मल्यानंतर वर्ष-दीड- वर्ष खूप खूप रडणारा श्रेयस आज मात्र स्वत:सह सर्वांना खूप हसवतो, हीच आमच्यासाठी फार मोलाची गोष्ट आहे. सर्वसामान्य मुलांप्रमाणेच दिव्यांग मुलांनाही सक्षम बनविण्यासाठी त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा नेहमी सकारात्मक असला पाहिजे. सर्वसामान्यांना चिंतन करायला लावेल अशा प्रतिभा व सुप्त गुण दिव्यांग मुलांमध्ये असतात, फक्त त्या शोधून व त्याला प्रेरणा देऊन उजेडात आणणे महत्वाचे आहे. सर्वसामान्य मुलांप्रमाणे दिव्यांग मुलांना समाजात मानाचे स्थान मिळावे, त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शालेय व सामाजिक जीवनात दिव्यांगत्व अडथळा म्हणून समोर येऊ नये याकरिता शिक्षक वर्गाने सतत प्रयत्नशील असले पाहिजे. इतर मुलांप्रमाणेच दिव्यांग मुलांनाही प्रवाहात आणण्यासाठी सुलभकाची भूमिका बजावण्याचे कार्य सर्व शिक्षक वर्गाने केले पाहिजे.

अशाप्रकारे आमच्या शाळेतील श्रेयसचा प्रगतीचा आलेख नक्कीच उंचावत चालला आहे. सुरुवातीच्या त्याच्या अस्थिरतेचं प्रमाण काही अंशी का होईना, वेगवेगळ्या कृतींमध्ये रमण्यामुळे कमी झालं आहे. या सगळ्यामुळे कुठेतरी त्याला शाळेचा लळा लागल्याचे दिसून येत आहे.

श्री. दीपक रामचंद्र धामापूरकर. (मुख्याध्यापक)
सौ. शुभदा शालिवाहन पाळेकर. (उपशिक्षिका)
श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र मगदूम (सहायक शिक्षक)
**जि.प.पूर्ण प्राथमिक शाळा सोलगांव नं. २ , तालुका राजापूर , जिल्हा रत्नागिरी.**

https://photos.app.goo.gl/A8nUSV7Uyn7oCaJs5

# यशोगाथा

## प्रवास ..... जयच्या प्रगतीचा



दरवर्षी परिसरातील विद्यार्थी शाळेत प्रवेश घेतात. त्यांना ठरलेल्या पद्धतीनुसार आम्ही शिकवितो. शासनाची उदिष्टे, अधिकारी वर्गाचे मार्गदर्शन, घरचे संस्कार आणि शिक्षकांचे प्रयत्न यांचा परिणाम सर्वसाधारण विद्यार्थ्यावर होत असतो, पण हजारात एक विद्यार्थी असा असतो की, तो सर्व व्यवस्थेला आव्हान असतो. तेव्हा आपले परंपरागत ठरावीक ज्ञान पणास लागते. सर्वसाधारण अभ्यासक्रमासाठी तो नसतो, तर त्याला मान्य असणारा अभ्यासक्रम आपल्याला शोधावा लागतो. अर्थात चौकटी बाहेर जाऊन शिकविणे थोडे कठीणच असते.

आमच्या जि. प. कासारवेली शाळेत सन 2018 मध्ये इयत्ता पहिलीत जय समीर जाधव दाखल झाला. दिसायला सर्व सामान्यांसारखा असणारा जय हा दिव्यांग आहे. जय जेव्हा दाखल होणार हे सक्तिपात्र दाखल नुसार निश्चित झाले, तेव्हा शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती डोंगरे मॅडमनी व मी जयची पार्श्वभूमी जाणून घेतली, असता समजले की जयचा जन्म हा आठव्या महिन्यातील आहे. वैद्यकीय दृष्ट्या

नवव्या महिन्यातील बाळाचा जन्म हा योग्य समजला जातो. नऊ महिने पूर्ण होण्याआधी जन्मलेले बाळ अनेकवेळा सर्वसामान्य मुलांसारखे सुदृढ व अरोग्यदृष्ट्या सक्षम नसते. जयचे आई-बाबा सुशिक्षित असल्याने डॉक्टरी सल्ल्यानुसार बाळाचे संगोपन करीत होते. तब्येतीने नाजूक व खूप चंचल असणारा हा मुलगा जसा मोठा होत होता तसे आईच्या लक्षात येऊ लागले की, आपले बाळ सर्वसामान्य नाही, मात्र त्याला सर्वसामान्य बनविण्यासाठी तिची धडपड सुरू झाली. एका जागी जराही स्थिर न बसणारा हा मुलगा व त्याच्या मागून त्याच्या काळजीने धावणारी त्याची आई, त्याचे खाणे-पिणे स्वच्छता व आरोग्याकडे अधिक लक्ष देऊ लागली. आपल्या मुलाचे हे वेगळेपण तिने मनाने स्वीकारल्यामुळे खचून न जाता तिने त्याला इतर मुलांसारखे किमान वागता तरी यावे यासाठी कंबर कसली. विशेष म्हणजे विशेष मुलासाठी विशेष लक्ष देणारी आई त्याला परमेश्वरानेच योजून पाठविली आहे. त्याच्या आईच्या मदतीनेच तर मला त्याला वर्गात सामावून घेणे सोपे झाले.

जय इयत्ता पहिलीच्या वर्गात जूनपासून येऊ लागला अन् खऱ्या अर्थाने माझेही शिक्षण सुरू झाले. तो स्थिर बसत नव्हता. एका जागी थांबत नव्हता. मुलांची दप्तरे ओढ, कुठे पुस्तके फाड, तर कुणाला ढकलूनच दे यासारखे त्याचे खोडकर प्रताप सुरू झाले आणि माझ्यासमोर असणाऱ्या आव्हानाची जाणीव झाली. दोन वर्ग सांभाळत यालाही संयमीपणे आपल्याला सांभाळायचे आहे हे लक्षात आले. जय असा मोकळा राहिला तर तो असाच उड्या मारत राहील, सर्वांना त्रास देत राहील. यासाठी त्याला गुंतवून ठेवणाऱ्या क्रिया त्याच्याकडून करवून घेणे क्रमप्राप्त होते.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.डोंगरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाने, जयची आवड व गरज लक्षात घेऊन मी तशी वर्गरचना केली. मी त्याच्याशी संवाद साधण्याचा, त्याला बोलते करण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो स्थिर रहातच नसल्याने अजिबात प्रतिसाद देत नव्हता. मग त्याला काही ठोकळे देऊन त्यापासून वेगवेगळे आकार करून घेऊ लागले. इतर मुलांच्या सोबत बिया, मणी यांपासून वेगवेगळे आकार करून घेता घेता तो मुलांमध्ये बसू लागला, त्यांच्या सोबत खेळू लागला. तो तुमचाच मित्र आहे, त्यालाही तुम्ही सोबत घेतलेत तर तोही हळूहळू शिकेल, असे मी मुलांना समजावून सांगितल्यावर ती त्याला आपल्यात सामावून घेऊ लागली. मी जेव्हा काही कृती करुन घेण्यासाठी सर्व मुलांना गोलाकार बसवून कृती करुन घ्यायचे, तेव्हा कधी मध्येच तर, कधी माझ्या बाजूला बसून तो बघू लागला. हळूहळू कृतीत सहभाग घेऊ लागला याचे मला समाधान वाटू लागले.

मी जयकडून मनोरंजक अशा छोट्या छोट्या कृती करून घेऊ लागले. बाटलीत मणी टाकणे, पीठ किंवा क्लेचे वेगवेगळे आकार करून घेणे यांसारख्या कृतींमध्ये जय छान रमू लागला. सुरुवातीला तो अशा कृतीमध्ये फारसा रमायचा नाही. परंतु मी ही माझ्या प्रयत्नांमध्ये सातत्य राखून त्याच्याशी सवांद साधण्याचा प्रयत्न करीत राहिले. त्याला आपलेपणा वाटेल अशा दृष्टीने त्याच्या सहभागाने इतर सर्व मुलांसोबत काही कृती करुन घेतल्या. निरीक्षणाने असे लक्षात आले की, त्याला उड्या मारायला, सर्वांसोबत खेळायला आवडते. तसेच कृतियुक्त छोट्या बडबडगीतांची ही आवड आहे. सोपी बडबडगीते तो सतत बडबडू लागला. घरीही तो गाणी म्हणू लागला. कृती करून दाखवू लागला. एकंदर तो आता शाळेत रमू लागला. शाळा त्याला आपलीशी, जवळची वाटू लागली आहे, असे त्याच्या आईने मला सांगितल्यावर मी घेत असलेल्या मेहनतीचे चीज झाल्यासारखे वाटले.

रंगीत चित्रे व मोबाईलवरील व्हिडिओ पाहायला जयला आवडतात. तो या निमित्ताने माझ्या टेबलाजवळ येऊ लागला, खेळू लागला. वेगवेगळ्या प्राण्यांचे आवाज काढणे, उड्या मारणे, चालणे अशा कृती जय करू लागला. गाणी-गोष्टी शिकवितांना जय मधे मधे येऊ लागला व गाणी म्हणू लागला. मला आवाज देऊ लागला. मुलांना ओळखून त्यांची नावे सांगू लागला. स्वतःचे नाव सांगू लागला. अचूक वस्तू ओळखून त्या देऊ लागला, इंग्रजी ,मराठी कविता म्हणू लागला. चित्रे पाहून त्यांची इंग्रजी ,मराठी नावे सांगू लागला. इंग्लिश नाव सांगताना This is a cat असे पूर्ण वाक्यात उत्तरे देऊ लागला. 1 ते 10 अंक म्हणू लागला, 1 ते 3 अंक ओळखू लागला. घरी गेल्यावरही जय पुस्तक घेऊन चित्रे पाहू लागला. मुलांसोबत रांगेत बसून जय स्वतःच्या हाताने जेवू लागला. स्वतःच्या वस्तू ओळखू लागला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे जय पीठ किवा माती (क्ले) पासून प्राणी, पक्षी यांची हुबेहूब प्रतिकृती बनवू लागला आहे.

अशा या आमच्या जयच्या प्रगतीचा आलेख नक्कीच उंचावत चालला आहे. सुरुवातीला त्याच्यात असणाऱ्या अस्थिरतेचे प्रमाण काही अंशी का होईना कृतींमध्ये रमण्यामुळे कमी झाले आहे. खोड्याही कमी झाल्या आहेत. त्याला मुलांचा, बाईंचा व शाळेचाही लळा लागल्याचे दिसून येत आहे. आपल्या शिक्षकांच्या कारकिर्दीत असे जय कधीतरी भेटतात. त्यांना त्यांच्या कलाने अध्यापन केले तर त्यांच्यात खूप चांगली आशादायी प्रगती दिसू शकते. असे असामान्य विद्यार्थी आपल्या आयुष्यात येतात आणि आपला शिक्षकीपेशा समृद्ध करून जातात.

जयचे नशीब चांगले की, त्याला सुशिक्षित आई मिळाली. अर्थातच तिच्या प्रयत्नांमुळेच जय शाळेची पायरी चढला. जयने आपले वेगळेपण पदोपदी सिद्ध केले. व्यवस्थेने दिव्यांग ठरलेला जय हा खरंच असामान्य आहे. जयला शिकविता शिकविता आपल्या मर्यादा अधिक ठळक होतात. त्यातून आपण कधीही न घेतलेले अनुभव घेत असतो. मूल्यमापन जरी जय पुरतं सीमित असलं तरी त्याची प्रगती आपल जगणं उत्साही करुन जाते. खरंच हा वेगळ्या वाटेवरचा प्रवास मन प्रफुल्लित करणारा आहे.

श्रीम. वर्षा संदेश घाग (वर्ग शिक्षिका)

**जि. प. पू. प्रा. शाळा कासारवेली , ता. जि. रत्नागिरी**

https://photos.app.goo.gl/WhyEc8ACebYHWn3i8

## चिंतनात्मक प्रश्न

१) श्री. धामापूरकर सर यांच्या यशोगाथेबद्दल तुमचे मत लिहा.
२) श्रीम. घाग मॅडम यांचे कोणते गुणविशेष आपल्याला दिसतात?
३) जयला शाळेची आवड कशी निर्माण झाली?
४) दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना शिक्षकांना येणाऱ्या अडचणी/समस्यांची यादी करा.
५) दिव्यांग विद्यार्थी तुमच्या शाळेत/वर्गात दाखल झाल्यास तुम्ही मुख्याध्यापक/ शिक्षक म्हणून काय कराल?

**शालेय विकास आराखडा नियोजन** : आपण कार्यरत असलेल्या शाळेची सद्य:स्थिती लक्षात घेऊन शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी १ वर्षाचा शाळा विकास आराखडा तयार करा.

**समावेशित शिक्षण क्षेत्रात दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत काम करताना असेही करता येईल**-दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत काम करताना शिक्षक व विद्यार्थी यांना अनेक अडचणी येतात. या अडचणींवर मात करण्यासाठी असेही करता येईल.

1) दिव्यांग विद्यार्थी शाळेत दाखल होईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत.
2) पालक व विद्यार्थी यांच्या मनात शाळा व शिक्षक यांच्या विषयी विश्वास निर्माण करावा.
3) विद्यार्थ्यांची अध्ययन शैली लक्षात घेऊन आवश्यक सेवासुविधा उपलब्ध कराव्यात.
4) सामान्य विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थी यांतील आंतरक्रिया वाढवाव्या.
5) दिव्यांग विद्यार्थी अध्ययन- अध्यापन पद्धती आत्मसात कराव्यात. त्या संबंधित प्रशिक्षणे पूर्ण करावीत.
6) शालेय , सहशालेय उपक्रमांतील सहभाग वाढवावा.
7) अध्ययन शैली नुसार शैक्षणिक साहित्य निर्मिती करून गरजेनुरूप अध्यापन करावे व मूल्यमापन करावे.
8) विद्यार्थी प्रगतीसाठी पालक, समाज ,विशेष शिक्षक ,स्वयंसेवक, विशेषतज्ज्ञ,समन्वयक, शाळा व्यवस्थापन समिती यांचे अधिकाधिक सहकार्य घ्यावे .
9) सामाजिक कार्यातील सहभागासाठी विद्यार्थी व पालक यांना प्रोत्साहित करावे .
10) शासन व समाज सहभागातून दिव्यांग मुले /पालक यांच्यासाठी मेळावे, उद्‌बोधन कार्यशाळांचे आयोजन करावे.


## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने समावेशित शिक्षण क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भाने केलेला विचार

शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये मोठा वाव देण्यात आला आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यात आली आहे.

जन्माच्या वेळची परिस्थिती किंवा अन्य पार्श्वभूमीमुळे कोणतेही मूल शिकण्याची किंवा उत्कृष्टतेची संधी गमावणार नाही हे 2020 चे उद्दिष्ट आहे. लिंग, सामाजिक-सांस्कृतिक आणि भौगोलिक ओळख आणि अपंगत्व समाविष्ट असलेल्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित गटावर विशेष भर दिला जाईल. दिव्यांग मुले प्रशिक्षण,

संसाधन केंद्रे, राहण्याची सुविधा,विशेष उपकरणे ,योग्य तंत्रज्ञान आधारित साधने आणि त्यांच्या गरजेनुसार तयार करण्यात आलेल्या अन्य साधनांच्या मदतीने पूर्वप्राथमिक टप्प्यापासून उच्च शिक्षणापर्यंत नियमित शालेय शिक्षण प्रक्रियेत पूर्णपणे भाग घेण्यास सक्षम असतील.




## समावेशित शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका या मोड्यूलची शालेय नेतृत्व व शिक्षकांच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता

सर्व समावेशित शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकविताना अनेक आव्हाने आहेत. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकत असताना अनेक अडचणी येतात. सदर मोड्यूल समावेशित शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांना मार्गदर्शक ठरणार आहे.

- सर्वसामान्य मुले आणि दिव्यांग मुले यांचा एकमेकांशी संबंध येत असल्यामुळे शालेय वातावरणात ते एकमेकांना मदत करायला शिकतात. एकमेकांपासून ते संवाद व आंतरक्रियात्मक कौशल्य शिकतील.
- शिक्षण हक्क कायदा 2009 यशस्वी अंमलबजावणी होण्यास मदत होईल.
- आऊट ऑफ द बॉक्स जाऊन काम करण्याची प्रेरणा शिक्षकांना मिळेल.
- उभय प्रकारची मुले परस्परांशी सकारात्मक वागतील. परिणामी भावी नागरिक म्हणून सामान्य मुलांना विशेष गरजा असलेल्या नागरिकांशी कसे वागावे हे उमजेल.
- शालेय नेतृत्वाला व शिक्षकांना समावेशित शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्याचे प्रभावी मार्ग माहीत होतील.

## समारोप

समावेशित शिक्षण क्षेत्रात काम करणे व त्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करणे हे अतिशय कठीण काम आहे. कितीही विपरीत व प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यामध्ये असते.

संबंधित क्षेत्रात काम करणारे मुख्याध्यापक आपल्या सहकारी शिक्षकांची साथ घेऊन त्यांना सतत प्रेरणा व प्रोत्साहन देतात. दिव्यांग मुलांच्या प्रगतीसाठी शिक्षक व मुख्याध्यापक, पालकांशी विश्वास व जिव्हाळ्याचे संबंध दृढ करतात. प्रसंगी समाजाचीही मदत याकामी मुख्याध्यापक घेतात. रत्नागिरी जिल्हयात सर्वसमावेशित शिक्षण क्षेत्रात जिल्हा समन्वयक व जिल्हा स्तरावरील त्यांची टीम ( विशेष तज्ञ व विशेष शिक्षक) दिव्यांग मुलांच्या शिक्षणासाठी व त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी अत्यंत मोलाची व साहाय्यभूत भूमिका पार पाडताना दिसतात.यांच्यामार्फत कोविड-१९ च्या काळात ‘कोरोनासोबत जगताना, एक किरण आशेचा इत्यादी उपक्रम, देवश्री – पापा का YouTube channel व विविध ऑनलाइन स्पर्धांचे आयोजन दिव्यांग विद्यार्थी व पालकांसाठी करण्यात आले. तसेच खेड तालुक्यात लोकसहभागाच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी थेरपी केंद्र उभारण्यात आले आहे.

महाराष्ट्रात समावेशित शिक्षण क्षेत्रात श्री. धामापूरकर व श्रीम. घाग यांसारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याच्या प्रेरणेतून समावेशित शिक्षण क्षेत्रातील बालकांच्या शिक्षणासाठी अनेक यशस्वी शालेय नेतृत्व उदयास यावी हीच अपेक्षा.

**https://photos.app.goo.gl/p1wB6bg3451HNaDv7**
**https://youtu.be/-zf0_6Up-Us**
**https://youtu.be/KmIOA9U7NB0**
**https://youtu.be/wYQBt7P8_sc**

## संदर्भसाहित्य


1. निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर 2019 ,संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 समग्र शिक्षा अंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी समावेशित शिक्षण प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील उपक्रमांच्या अंमलबजावणी बाबत सूचना 2019 20 महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
3. विशेष गरजा असलेल्या बालकांचे समावेशन. राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद.
4. घे भरारी विशेषांक समावेशित शिक्षण, रत्नागिरी. समग्र शिक्षा अभियान, डायट रत्नागिरी
5. शासन निर्णय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र. 22 जून 2015, 16 सप्टेंबर 2016, 9 जानेवारी 2017
6. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2016/प्र.क्र.302/विशि-3 दिनांक 4/3/2017
7. दिव्यांगासाठी महत्वाचे शासन निर्णय दिनांक 8 जानेवारी 2016, 11 जानेवारी 2017, 14 सप्टेंबर 2018, 16 ऑक्टोबर 2018.



**मोड्यूल विकसक**
श्रीम.दीपा मिलिंद सावंत
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**मार्गदर्शक**
डॉ.नेहा बेलसरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद